# प्रात्यक्षिक २. ग्रंथालय तालिकीकरण

**संहिता : एएसीआर–२१ (R) (२००५ च्या अद्ययावत आवृत्तीनुसार)**

**पार्श्वभूमी :** १९६१ मध्ये इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ लायब्ररी असोसिएशन अँड इन्स्टिट्युशन्सने पॅरिस येथे इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन कॅटलॉगिंग प्रिन्सिपल्स या आशयाची परिषद भरवली होती. या परिषदेत तालिकीकरणाच्या नियमांचा संच सादर करण्यात आला होता. आंतरराष्ट्रीय पातळीवर तालिकीकरणाचे नियम तयार करण्याकरिता ही परिषद भरवण्यात आली होती. अशा रीतीने १९६७ साली तालिकीकरणाची पहिली आंतरराष्ट्रीय संहिता प्रकाशित झाली. ही संहिता प्रकाशित करण्यात पुढील संस्थांचा सहभाग होता.

- दी अमेरिकन लायब्ररी असोसिएशन
- द लायब्ररी ऑफ काँग्रेस
- द लायब्ररी असोसिएशन
- द कॅनेडियन लायब्ररी असोसिएशन
- दी ऑस्ट्रेलियन लायब्ररी असोसिएशन

एएसीआर संहितेच्या दोन स्वतंत्र आवृत्त्या प्रकाशित करण्यात आल्या : द नॉर्थ अमेरिकन टेक्स्ट आणि ब्रिटिश टेक्स्ट.

पहिल्यांदा एएसीआर–१ या शीर्षकाने ही संहिता प्रकाशित करण्यात आली. ग्रंथाच्या शीर्षक पृष्ठावरील ग्रंथाविषयीची सूचीय माहिती ही ग्राह्य धरण्यात येऊन (अपवादात्मक स्थितीत ग्रंथात इतरत्र दिलेला तपशील ग्राह्य धरला जातो) नियम तयार केले गेले आहेत.

एएसीआर–२ ची दुसरी आवृत्ती १९७८ मध्ये प्रकाशित झाली. या आवृत्तीतही पुढील संस्थांचा सहभाग होता.

- द चार्टर्ड इन्स्टिट्यूट ऑफ लायब्ररी अँड इन्फॉरमेशन प्रोफेशनल्स
- दी अमेरिकन लायब्ररी असोसिएशन
- द लायब्ररी ऑफ काँग्रेस
- द लायब्ररी असोसिएशन
- द कॅनेडियन कमिटी ऑन कॅटलॉगिंग
- द ब्रिटिश लायब्ररी
- दी ऑस्ट्रेलियन लायब्ररी असोसिएशन

एएसीआर–२ ही सुधारित आवृत्ती प्रकाशित करण्याच्या दृष्टीने पुढील मार्गदर्शक तत्त्वे स्वीकारली गेली.

(अ) पहिल्या आवृत्तीत पॅरिस येथे तालिकीकरणाची जी तत्त्वे स्वीकारण्यात आली त्यांच्याशी साधर्म्य/सारखेपणा (conformity) असावा.

(आ) सूचीय नोंदींचे संगणकाच्या साहाय्याने नोंद करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे.

(इ) सर्व प्रकारच्या वाचन साहित्याच्या (छापील ग्रंथ व इतर प्रकारचे साहित्य) सूचीय वर्णनाचे मानक विकसित करणे. असे मानक विकसित करताना आयएसबीडी (एम) (M = Monograph = छापील ग्रंथ) हे पायाभूत मानक गृहीत धरण्यात आले.

(ई) ग्रंथेतर वाचन साहित्याच्या तालिकीकरणाचे नियम तयार करणे. हे नियम दी कॅनेडियन लायब्ररी असोसिएशन (CLA), द लायब्ररी असोसिएशन फॉर एज्युकेशनल कम्युनिकेशन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी (LAECT) आणि दी अमेरिकन लायब्ररी असोसिएशन (ALA) यांनी सुधारणा केलेल्या प्रकरण–१२ मधील १९६७ चे टेक्स्ट ह्यांच्या आधारे तयार केले गेले.

एएसीआर–२ मध्ये या नियमांच्या आधारे आयएसबीडी (जी) (G=General) हे मानक विकसित केले गेले. यालाच जनरल इंटरनॅशनल स्टँडर्ड बिब्लियोग्राफिक डिस्क्रिप्शन म्हणतात. म्हणजेच एएसीआर–२ ने वाचन साहित्याच्या सूचीय वर्णनाचे मानक विकसित केले आहेत.

एएसीआर–२ या संहितेची पुन्हा सुधारित आवृत्ती २००२ मध्ये प्रकाशित झाली. ही आवृत्ती एएसीआर–२R या नावाने ओळखली जाते. तसेच २००५ साली


पुन्हा काही दुरुस्त्यांसह नवीन आवृत्ती प्रकाशित करण्यात आली.

आता आपण पुढील प्रकारच्या नोंदींची एएसीआर (Anglo-American Cataloguing Rules) या तालिका संहितेनुसार ग्रंथांच्या तालिकीकरणाच्या प्राथमिक नियमांच्या प्रात्यक्षिकांसह अभ्यास करूया.

एएसीआर ने आयएसबीडी (जी) हे मानक विकसित केल्याने ग्रंथांकरिता जी मुख्य नोंद केली जाते त्या मुख्य नोंदीस 'मास्टर नोंद' अथवा 'युनिट कार्ड' असे संबोधले जाते. कारण, या मुख्य नोंदीच्या आधारेच इतर साहाय्यकारी नोंदीही (Added entries) त्याच पद्धतीने केल्या जातात.

**युनिट कार्डमधील समास (Indentions) :**

युनिट कार्डमध्ये ग्रंथाविषयीची सूचीय माहिती उताऱ्यांच्या (Paragraph) साहाय्याने विभागून दिली जाते. हे तालिका पत्र ५"×३" या आकाराचे असते. ग्रंथांची सूचीय माहिती देताना त्यामध्ये तीन उभे समास (Indentions) दोन दृश्य व एक अदृश्य असतात. ते पुढील आकृतीच्या साहाय्याने दर्शवले आहेत.




पहिला समास हा तालिकापत्राच्या कडेपासून ९ स्पेसेस, दुसरा समास १३ स्पेसेस व तिसरा समास १५ स्पेसेस असतो. तिसरा समास अदृश्य स्वरूपात असतो.

**युनिट कार्डमधील हँगिंग समास (Hanging Indentions) :**

जेव्हा ग्रंथ तीनपेक्षा जास्त लेखकांनी लिहिलेला असतो किंवा संपादित केलेला असतो तेव्हा अशा प्रकारच्या समासाचा उपयोग करून मुख्य तालिका नोंद केली जाते. नोंदीची सुरुवात ग्रंथनामाने (Title of the book) होते. ही सुरुवात पहिल्या समासापासून होते व राहिलेली ग्रंथाविषयीची सर्व माहिती त्यापुढे दुसऱ्या समासापासून होते व पहिल्या उताऱ्याशी संबंधित माहिती दुसऱ्या समासापासूनच लिहिली जाते. जसे, ग्रंथनाम, ग्रंथाच्या आशयाची जबाबदारी असलेल्या व्यक्तीचे नाम, आवृत्ती, प्रकाशन स्थळ, प्रकाशन वर्ष इत्यादी.

तथापि, दुसऱ्या उताऱ्यापासून सुरू होणाऱ्या नोंदींच्या घटकांची नोंद (उदा., पृष्ठे, इतर समाविष्ट मजकूर – नकाशे, ॲटलास इत्यादी), आकार, माला इत्यादी दुसऱ्या समासापासूनच नोंदवले जातात.

| | | |
|---|---|---|
| | Title: | Subtitle/First statement of responsibility; |
| | | each statement of responsibility. – edition |
| | | statement. – first place of publication : |
| | | Publisher, Year of publication. |
| | | Extent of item : other physical details; |
| | | dimensions. - (Series ; series no.) |
| | | Note :<br>ISBN |
| | | 1. Subject Heading/s |
| | | i. Title |

अशा प्रकारच्या ग्रंथांच्या साहाय्यकारी नोंदी (Added entries) या तिसऱ्या समासापासून सुरु होतात. अशा साहाय्यकारी नोंदींचा आराखडा पुढीलप्रमाणे :

| | | |
|---|---|---|
| | | साहाय्यकारी नोंदीचे शीर्षक |
| | मुख्य | नोंदीच्या घटकांची सुरुवात (शीर्षक)/आशयास जबाबदार |
| वर्गांक | | असलेल्या व्यक्तीचे नाम. – आवृत्ती. – प्रकाशन स्थळ : |
| ग्रंथांक | | प्रकाशक, प्रकाशन वर्ष |
| | | दुसरा उतारा (मुख्य नोंदीप्रमाणेच) |
| | | तिसरा उतारा (मुख्य नोंदीप्रमाणेच) |
| दाखल अंक | | ISBN |
| | | १. विषय शीर्षक/के |
| | | I. ग्रंथशीर्षक |

एएसीआर-२ नुसार मुख्य नोंदीचा व साहाय्यकारी नोंदीचा आराखडा :

एएसीआर-२ नुसार मुख्य नोंदीचा आराखडा पुढील आकृतीत दर्शविला आहे. ह्यात मुख्य नोंदीतील शीर्षकाची सुरुवातही पहिल्या समासापासून (first indention) होते. तर सहायक नोंदीतील शीर्षकाच्या नोंदीची सुरुवात दुसऱ्या समासापासून (second indention) होते.

| | | |
|---|---|---|
| | लेखकाचे | नाव (आडनावाने सुरुवात) |
| | | ग्रंथनाम : उपनाम (असल्यास) / लेखक |
| वर्गांक | (शीर्षक | पृष्ठावर जसे दिले असेल तसे). - आवृत्ती |
| ग्रंथांक | . __ | प्रकाशन स्थळ : प्रकाशक, प्रकाशन वर्ष. |
| | | ग्रंथाची पृष्ठे : ग्रंथातील चित्रे, नकाशे, ॲटलास ; |
| | आकार | . _ (माला शीर्षक ; माला क्रमांक) |
| दाखल अंक | | टीपा : |
| | | ISBN |
| | | १. विषय शीर्षक<br>I. ग्रंथनाम<br>II. इतर लेखक, संपादक |

आता आपण साहाय्यकारी नोंदीचा आराखडा पाहू या.

| | | |
|---|---|---|
| | | साहाय्यकारी नोंदीचे शीर्षक |
| | मुख्य | नोंदीतील लेखकाचे नाव (आडनावाने सुरुवात) |
| वर्गांक | | ग्रंथनाम = समांतर ग्रंथनाम (असल्यास) : ग्रंथाचे |
| ग्रंथांक | उपनाम/ | लेखक . _ आवृत्ती/ आवृत्तीचा संपादक (असल्यास). |
| | . __ | प्रकाशन स्थळ : प्रकाशक, प्रकाशन वर्ष. |
| | | ग्रंथाची पृष्ठे : ग्रंथातील चित्रे, नकाशे, ॲटलास |
| दाखल अंक | ; आकार | . __ (माला शीर्षक ; माला क्रमांक) |
| | | टीपा<br>ISBN<br>नक्कल शीर्षके |
| | | १. ग्रंथनाम<br>२. इतर लेखक, संपादक<br>I. विषय शीर्षक |

एएसीआर-२ च्या नियमांच्या पहिल्या भागात ग्रंथाच्या वर्णनाचे नियम व नोंदी तयार करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

यामध्ये ग्रंथ, पत्रके, छापील पत्रक (sheets), नकाशे, ॲटलास, हस्तलिखिते, संगीत रेकॉर्डस, साऊंड रेकॉर्डिंग, मायक्रो फॉर्म्स, नियतकालिक इत्यादींचा समावेश होतो.

तालिकाकाराला कोणत्या प्रलेखाच्या कोणत्या घटकास प्राधान्य देऊन नोंद कशी करावी याविषयी मार्गदर्शन केलेले आहे.

विभाग दोन मध्ये एकूण सहा प्रकरणे आहेत. या प्रकरणांद्वारे विविध नोंदींचे शीर्षक, एकसमान शीर्षक (Uniform title), माहिती शोधक घटक, व्यक्तींच्या नावाचे शीर्षक, भौगोलिक नावांचे शीर्षक, समष्टी संस्थांचे शीर्षक व संदर्भ याविषयीच्या नियमांचा उलगडा होतो.

**एएसीआर-२ तालिका संहितेप्रमाणे ग्रंथांच्या तालिका नोंदी तयार करण्याचे नियम :**

एएसीआर-२ या तालिका संहितेतील ग्रंथांच्या तालिका नोंदी तयार करण्याचे नियम पुढीलप्रमाणे (परंतु अतिशय सखोलपणे आपण विविध स्वरूपाच्या वाचन साहित्यांच्या तालिका नोंदी तयार करण्याचे नियम अभ्यासणार नसून केवळ एक लेखक, दोन लेखक, तीन लेखकांनी व तीन पेक्षा जास्त लेखकांनी लिहिलेल्या ग्रंथांचे नियम आपण अभ्यासणार आहोत – संदर्भ : अँग्लो-अमेरिकन कॅटलॉगिंग रुल्स, २ री आ. २००५).

**रूल 1.0A3 : ग्रंथाविषयीच्या सूचीय माहितीचा स्रोत :**

या नियमानुसार ग्रंथाचे तालिकीकरण करताना ग्रंथाचे शीर्षक पृष्ठ (पान) हे अधिकृत सूचीय माहितीचा स्रोत म्हणून घ्यावा. शीर्षक पृष्ठावर संपूर्ण सूचीय माहिती नसल्यास संपूर्ण ग्रंथातून इतरत्रच्या भागातूनही माहिती घेऊन तिचा उपयोग तालिका नोंदी तयार करण्यासाठी केला जाऊ शकतो.

**रूल 1.0C : शुद्धलेखन चिन्हांविषयीचा नियम :**

तालिका नोंदीतील प्रत्येक विभागाच्या अगोदर संबंधित शुद्धलेखन चिन्ह किंवा चिन्हे देणे आवश्यक आहे (केवळ नोंदीच्या सुरुवातीस असे चिन्ह वापरले जात नाही). उदा., पूर्णविराम (.), स्पेस (space), आडवी रेष (dash), स्वल्पविराम (,), अल्पविराम (;), कोलन / विसर्ग (:), बरोबरचे चिन्ह (=) व चौकोनी कंस [ ].

**रूल 1.1B1 : ग्रंथनाम किंवा ग्रंथ शीर्षक या विषयीचा नियम :**

ज्या ग्रंथाची तालिका नोंद करायची आहे त्याच्या शीर्षक पृष्ठावर (Title page) ज्या पद्धतीने ग्रंथनाम दिलेले असेल त्याचप्रमाणे ते तालिका नोंदीत लिहिले

जावे. ग्रंथास समांतर ग्रंथनाम असल्यास ते मुख्य ग्रंथनामानंतर बरोबरचे (equal to sign) चिन्ह (=) अगोदर देऊन लिहावे व ग्रंथात उपशीर्षक असल्यास समांतर ग्रंथनामानंतर (असल्यास) विसर्ग चिन्ह (;) देऊन उपग्रंथनाम (उपग्रंथ शीर्षक) लिहावे.

**रूल 1.1F1 : ग्रंथातील मजकुराची जबाबदारी असलेल्या लेखकासंबंधीचा नियम :**

ग्रंथातील शीर्षक / ग्रंथनाम पृष्ठावर लेखकाचे नाव जसे दिले असेल ते तसेच घ्यावे. मात्र मुख्य नोंदीत शीर्षक भागात लेखकाचे नाव लिहिताना आडनावाने सुरुवात करावी व त्यानंतर स्वल्पविराम देऊन पहिले नाव व दुसरे नाव (वडिलांचे/पतीचे नाव) लिहावे. पहिल्या उताऱ्यात (paragraph) जेव्हा ग्रंथकाराची माहिती शीर्षकानंतर दिली जाते तेव्हा लेखकाच्या नावाचा क्रम शीर्षक पृष्ठावर जसा दिला असेल त्याच पद्धतीने लिहावा.

लेखकाच्या नावाची माहिती शीर्षक पृष्ठावर नसल्यास व ती इतर स्रोतांकडून प्राप्त केल्यास त्याचे नाव चौकोन कंसात (Square bracket [ ]) लिहावे.

लेखकाच्या नावासमोर जर काही सन्मानदर्शक शब्द अथवा पदवी दर्शवणारे शब्द लिहिलेले असतील तर ते लिहू नयेत. अन्यथा, त्यांची खरोखरच गरज असेल तरच ते लिहावेत. उदा., डॉक्टर, प्राध्यापक, माननीय इत्यादी लिहू नयेत.

**रूल 1.2 : ग्रंथाची आवृत्ती**

ग्रंथाची आवृत्ती हा विभाग तालिका नोंदीमध्ये लेखकानंतर येतो (मुख्य नोंद व साहाय्यकारी नोंदीच्या सुरुवातीस दिलेला आराखडा बघा). ग्रंथाच्या ग्रंथनाम पृष्ठावर (Recto side) अथवा त्याच्या मागील बाजूस (Verso side) आवृत्ती संदर्भातील माहिती दिलेली असते. ती माहिती अधिकृत समजून घ्यावी.

**रूल 1.2B1 : आवृत्ती संबंधित माहिती कशी लिहावी**

आवृत्तीची माहिती तालिका नोंदीमध्ये देताना लघुरूप स्वरूपात (abbreviation) देण्यात यावी. उदा., ग्रंथात 'Second edition' अशी माहिती दिलेली असल्यास ती लिहिताना '$2^{nd}$ ed.' अशी लिहावी. या अगोदर पूर्णविराम (full stop) स्पेस (space) आडवी रेषा (dash) स्पेस (space) देऊन लिहावी.

**रूल 1.4 : प्रकाशन, वितरण इत्यादीच्या माहिती संबंधीचे नियम :**

**रूल 1.4AC1 : प्रकाशन स्थळ**

ग्रंथाचे प्रकाशन स्थळ हे ग्रंथनाम पृष्ठावर (Title page) ज्या पद्धतीने दिले असेल तसेच ते लिहावे. हा भाग लेखकानंतर अथवा संपादकानंतर (असल्यास) येतो. प्रकाशन स्थळाची माहिती लिहिताना आवृत्तीनंतर पूर्णविराम (full stop) स्पेस (space) आडवी रेषा (dash) स्पेस (space) ही चिन्हे लिहून नंतरच लिहावी (मुख्य नोंदीचा व साहाय्यकारी नोंदीचा आराखडा बघावा).

**रूल 1.4D : प्रकाशक, वितरक इत्यादी संबंधीची माहिती :**

प्रकाशन स्थळानंतर प्रकाशकाविषयीची माहिती दिली जाते. त्यापूर्वी विसर्ग चिन्ह (Colon) दिले जाते. उदा.,

- लंडन : मॅकमिलन
- टोरोंटो : युनिव्हर्सिटी ऑफ टोरोंटो प्रेस

**रूल 1.4F : प्रकाशन व वितरण तारीख इत्यादीसंबंधीचा नियम :**

ग्रंथनाम पृष्ठावर उजव्या बाजूस अथवा डाव्या बाजूस (recto and verso of the title page) दिल्याप्रमाणे लिहावे. प्रकाशन वर्ष हे इंडो-अरेबिक क्रमांकाच्याच स्वरूपात लिहावे. यापूर्वी स्वल्पविराम चिन्ह लिहावे. उदा.,

, १९६२

, २०१८

, २०१९

**रूल 1.5 : कोलेशन संबंधीचे नियम :** ग्रंथाची प्राथमिक पृष्ठे, मुख्य पृष्ठे, ग्रंथात असलेले नकाशे, चित्रे, ॲटलास व ग्रंथा बरोबरील इतर साहित्य (सी-डी, फ्लॉपी) याविषयीचे नियम

**रूल 1.5A1 :** या विभागातील ग्रंथाचे विविध माहिती घटक लिहिताना त्या अगोदर लिहायच्या चिन्हांचे नियम :

या विभागाची सुरुवात नवीन उताऱ्यापासून दुसऱ्या समासापासून करण्यात यावी. सुरुवातीस ग्रंथाच्या पृष्ठांविषयी माहिती दिल्यानंतर ग्रंथातील नकाशे, चित्रे, प्लेटस याविषयीची माहिती देण्यापूर्वी विसर्ग (:) चिन्ह लिहावे व ही माहिती देण्यात यावी. ग्रंथाच्या आकाराविषयी माहिती देण्यापूर्वी अल्पविराम (;) हे चिन्ह वापरावे. ग्रंथाचा आकार नेहमी सें.मी. या स्वरुपात द्यावा. ग्रंथासोबत काही साहित्य असल्यास त्यापूर्वी (+) हे चिन्ह लिहून त्याविषयीची माहिती लिहिली जाते. उदा., एखाद्या ग्रंथासोबत 'सोल्युशन', 'सी-डी', एखाद्या टेबलचे मॅन्युअल (उदा., लॉगरिदमिक टेबल) स्वतंत्रपणे दिले असल्यास अशी माहिती या विभागात लिहिली जाते. उदा.,

+ सी-डी, टेबल

+ फ्लॉपी, डीव्हीडी

यानंतर याच उताऱ्यात 'माला' (Series) विषयीचा घटक येतो. ग्रंथ 'माले'मध्ये लिहिलेला असल्यास (आपण सध्या याची उदाहरणे अभ्यासणार नाही परंतु नोंदीतील घटक म्हणून आपण याचा अभ्यास करतोय) मालेविषयीची माहिती ही गोल कंसात '( )' लिहिली जाते. त्यापूर्वी पूर्णविराम, स्पेस, आडवी रेषा, स्पेस ही चिन्हे लिहिली जातात. गोल कंसात मालेचे नाव लिहून त्यापुढे अल्पविराम चिन्ह (;) लिहून मालेचा क्रमांक लिहिला जातो.

**रूल 1.7 : टीप विभाग (Note Area) :**

टीपा लिहिताना सुरुवात नवीन उताऱ्याच्या साहाय्याने दुसऱ्या समासापासून (second indention) करावी. एकापेक्षा जास्त टीपा असल्यास प्रत्येक टिपेकरिता नवीन उताऱ्यापासून (second indention) सुरुवात करावी.

ग्रंथाविषयी अधिकची माहिती द्यायची असल्यास ती टीप/टिपा स्वरूपात दिली जाते. टीप लिहून झाल्यावर शेवटी पूर्णविराम द्यावा. उदा.,

- Originally published : London : Gray, 1871
- Revision of : 3rd ed. London : Macmillan, 1953

जर टीप विधानाच्या स्वरूपात असेल तर ती दुहेरी अवतरण चिन्हात (“ ”) लिहावी. उदा., “Published for the Royal Institute of Public Administration.”

**रूल 1.8 : आयएसबीएन व आयएसएसएन या क्रमांकाचा विभाग व त्या संदर्भातील नियम**

**रूल 1.8A2 : माहितीचा स्रोत**

या क्रमांकाविषयीची माहिती (ISBN व ISSN) कोणत्याही स्रोतांमधून घेतली तरी चालेल. अर्थातच, ग्रंथात नसल्यास इतर स्रोतांमधून माहिती घेतली जाऊ शकते. इतर स्रोतांमधून हा क्रमांक घेतल्यास तो चौकोन कंसात लिहिण्याची आवश्यकता नाही.

**नोंदीतील काही इतर घटकांविषयीचे नियम :**

नोंदीतील काही इतर घटकांविषयीचे नियम पुढील प्रमाणे आहेत. उदा., वर्गांक, ग्रंथांक व दाखल अंक हे कुठे व कसे लिहावेत.

**वर्गांक :** वर्गांक तालिका पत्राच्या वरच्या बाजूपासून (पहिल्या समासाच्या अलीकडे) तिसऱ्या अथवा चौथ्या ओळीवर लिहावा. जर वर्गांक मोठा असेल तर तो तालिका पत्राच्या वरच्या बाजूस (नोंदीच्या शीर्षकाच्या ओळीच्या वर) लिहिला तरी चालेल.

**ग्रंथांक :** ग्रंथांक हा वर्गांकाच्या खाली, चौथ्या ओळीवर (अर्थातच पहिल्या समासापूर्वी) तालिका पत्राच्या डाव्या कडेपासून एक स्पेस सोडून लिहावा.

**दाखल अंक :** दाखल अंक सातव्या ओळीवर, तालिका पत्राच्या डाव्या कडेपासून एक स्पेस सोडून पहिल्या समासात लिहावा.

अशा पद्धतीने प्राथमिक नियमांची व तालिकेतील मुख्य नोंद व साहाय्यकारी नोंदींचा आराखडा याविषयी माहिती घेतल्यानंतर काही ग्रंथांविषयीची सूचीय माहिती देऊन त्यांच्या मुख्य नोंदी व साहाय्यकारी नोंदी कशा केल्या जातील ते पाहूया.

**विषय शीर्षक देण्याच्या विविध पद्धती**

तालिकीकरणात नोंदींच्या विविध प्रकारांमध्ये ज्याप्रमाणे सूचीय माहितीस महत्त्व आहे तसेच महत्व ग्रंथातील मजकूराच्या आशयासही आहे. वाचक हा ग्रंथनाम, लेखक, संपादक, भाषांतरकार, माला इत्यादीच्या साहाय्याने वाचन साहित्याचा शोध घेतो. त्याच प्रमाणे आधुनिक काळात विषय 'दृष्टिकोनास' मोठ्या प्रमाणावर महत्त्व प्राप्त झाले आहे. कारण वाचकास हव्या असलेल्या माहितीचा शोध घेण्याकरिता 'विषय दृष्टिकोन' हा जास्त जवळचा व त्याच्याशी संबंधित संज्ञा तंतोतंत हव्या असलेल्या विषयासंबंधी असल्यास त्या विषयावरील सर्व वाचन साहित्य एकत्रित प्रतिप्राप्त होते. त्याचमुळे, तज्ज्ञ प्रणाली (Expert System), कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence) व गुगल स्कॉलर (Google Scholar) इत्यादीमध्ये हवी असलेली माहिती त्वरित व अचूकपणे प्रतिप्राप्त होण्याकरिता विषय संज्ञांचे योग्य ते सादरीकरण कसे करता येईल याविषयी मोठ्या प्रमाणावर संशोधन झाले आहे व अजूनही त्यावर नवीन संशोधन चालू आहे. याच प्रमाणे 'नॅचरल लँग्वेज प्रोसेसिंग आज्ञावली' ही विकसित करण्यात आली आहे. संशोधनाकरिता वाङ्मय शोध अथवा वाचन साहित्य शोध (Literature Search) करताना 'विषय दृष्टिकोन' हाच जास्त उपयोगाचा असतो. त्यामुळे आधुनिक ग्रंथपालनात 'विषय दृष्टिकोनातून" माहिती प्रतिप्राप्तीच्या कार्यास अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. कारण यामुळे योग्य माहिती प्रतिप्राप्त होते.

**विषय शीर्षके देण्याची विविध साधने (Tools of Subject Headings) :**

**१. विषय शीर्षक यादी (List of Subject Headings) :**

यामध्ये सर्व विषयांकरिता एकत्रित संज्ञा दिलेल्या असतात. अशा विषय शीर्षक याद्यांमधून ग्रंथाच्या आशयाचे विश्लेषण करून योग्य त्या विषय शीर्षकांची निवड केली जाते. ग्रंथातील विषयाचे प्रतिनिधित्व करणारी प्रमाणित संज्ञा आणि शीर्षक तसेच इतर पर्यायी संज्ञा यांच्या साहाय्याने स्वतंत्र विषय शीर्षक नोंदी (तालिका नोंदी) करता येतात. उदा., सीयर्स लिस्ट ऑफ सब्जेक्ट हेडिंग्ज, लायब्ररी ऑफ काँग्रेस सब्जेक्ट हेडींग्ज व मेडीकल सब्जेक्ट हेडींग्ज इत्यादी.

**२. नियंत्रित संज्ञा संग्रह (Controlled Vocabulary) :**

तालिकेमध्ये सखोल विषय शीर्षकांच्या साहाय्याने विषय शीर्षक नोंदी करणे अत्यावश्यक असते. विषय शीर्षक याद्यांबरोबरच नियंत्रित संज्ञा संग्रह विकसित करण्यात आले व अद्यापिही विषयवार संज्ञा संग्रह विकसित केले जात आहेत.

**नियंत्रित संज्ञा संग्रह म्हणजे काय?**

**व्याख्या :** अमिताभ चटर्जी यांच्या मते, "नियंत्रित संज्ञा संग्रह म्हणजे अर्थाच्या दृष्टीने एकमेकांशी निगडित असलेल्या संज्ञांचा नियंत्रित संज्ञा संग्रह व ज्या विषयाचा तो संज्ञा संग्रह आहे त्या विषयाशी संबंधित संज्ञांची व्यापक प्रमाणावर माहिती ह्यात दिलेली असते." (A controlled dynamic vocabulary of semantically related terms offering comprehensive coverage of domain of knowledge).

**नियंत्रित संज्ञा संग्रहाची गरज :**

ज्ञानक्षेत्रात सर्व विषयांच्या संज्ञेमध्ये नवीन भर पडत असते, त्याच प्रमाणे अनेक संज्ञांना समानार्थी संज्ञा (Synonyms) अस्तित्वात असतात. परंतु, ज्या विषयाच्या ग्रंथांच्या विषय शीर्षक नोंदी करायच्या आहेत तो विषय कोणत्या प्रमाणित संज्ञेच्या साहाय्याने सादर करता येईल ती संज्ञा निवडावी लागते. ती संज्ञा प्रचलित असावी (नवीनतम) व त्या संज्ञेच्या साहाय्याने संबंधित विषयाची त्वरित कल्पना यावी असा त्यात उद्देश असतो. नियंत्रित संज्ञा संग्रहाचा दुसरा उद्देश म्हणजे अर्थाच्या दृष्टीने काही संज्ञा एकमेकांशी संबंधित असतात. परंतु, त्या विस्कळीत स्वरूपात असतात. अशा संज्ञांना एकत्रित करून त्यांच्यात दुवा प्रस्थापित करण्याचे कार्य नियंत्रित संज्ञा संग्रहात केले जाते. नियंत्रित संज्ञा संग्रहासच 'थिसॉरस' असे संबोधले जाते. हल्ली प्रत्येक विषयाचे स्वतंत्रपणे थिसॉरस विकसित केले जात आहेत.

'लायब्ररी ऑफ काँग्रेस सब्जेक्ट हेडींग्ज' ची नवीन आवृत्ती ही थिसॉरस स्वरूपात प्रकाशित झाली आहे. त्याचप्रमाणे 'सियर्स लिस्ट ऑफ सब्जेक्ट हेडींग्ज' ची नवीन आवृत्ती ही थिसॉरस स्वरूपात प्रकाशित झाली आहे. थिसॉरसचा महत्त्वपूर्ण उपयोग म्हणजे संकलित डेटाबेसमधून माहिती प्रतिप्राप्त करण्यात मदत होते.

**३. शृंखला प्रक्रिया (Chain Procedure) :**

शृंखला प्रक्रिया ही तालिकीकरणातील डॉ. एस. आर. रंगनाथन यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. शृंखला प्रक्रिया ही विषय शीर्षके तयार करण्याची एक प्रकारची निम्नयांत्रिक पद्धती होय. वर्गीकृत तालिकेत (Classified Catalogue) व एएसीआर पद्धतीतही विषय शीर्षक नोंदी (Class Index Entries) करण्यासाठी या पद्धतीचा उपयोग करता येतो. डॉ.रंगनाथन यांनी 'थिअरी ऑफ लायब्ररी कॅटलॉग' या त्यांच्या ग्रंथात पहिल्यांदा शृंखला प्रक्रिया नमूद केली आहे. या पद्धतीमुळे अचूक विषय शीर्षके देण्यात मदत झाली.

या प्रक्रियेचे मुख्य तत्त्व म्हणजे वर्गांकावरून विषय शीर्षकात रूपांतर केले जाते त्याला विषय शीर्षक नोंद (यालाच डॉ.रंगनाथन 'क्लास इंडेक्स एन्ट्री') असे म्हणतात. जरी डॉ.रंगनाथन यांनी कोलन वर्गीकरण पद्धती व क्लासिफाईड कॅटलॉगच्या अनुषंगाने या शृंखला प्रक्रियेची उपयुक्तता स्पष्ट केली असली तरीही डीडीसी (ड्युई डेसिमल क्लासिफिकेशन) या वर्गीकरण पद्धतीच्या वर्गांकाच्या संदर्भातही ही प्रक्रिया वापरता येऊ शकते. एएसीआर संहितेनुसार तालिकीकरण करतानाही विषय शीर्षक नोंदी करण्यासाठी या प्रक्रियेचा (Chain procedure) उपयोग केला जाऊ शकतो.

वर्गांकामधील प्रत्येक डिजिटचे (काही डिजिट्सचा अपवाद सोडून) रूपांतर विषय शीर्षकात केले जाते. वर्गांकातील पहिला अंक (डिजिट) हा विषयाचा पहिला दुवा असतो, वर्गांकातील दुसरे दोन अंक (डिजिटस्) विषयाचा दुसरा दुवा दर्शवितात, याच प्रमाणे पुढे हीच प्रक्रिया अवलंबिली जाते. विषयाचा शेवटचा दुवा वर्गांकाहून तयार केला जातो व तो सूक्ष्म विषय दुवा असतो.

दुवे (Links) हे विविध प्रकारचे असतात :

**१. फसवा दुवा (False Link) :** फसवा दुवा म्हणजे वर्गांकातील जोड चिन्हे. जसे , ; : . '

प्रावस्था संबंध (Phase Relation) : जे अंकाच्या (चिन्हाच्या) साहाय्याने दर्शवले जातात, ते चिन्ह. उदा., ० (शून्य).

पैलू अंतर्गत संबंध दर्शवणारे चिन्ह (Intra Facet) : पंक्तींमध्ये (Intra-array) प्रावस्था संबंध दर्शवणारे चिन्ह किंवा वर्गांकात काल पैलूचे प्रतिनिधित्व करणारे चिन्ह. उदा., विसावे शतक.

**२. ज्या दुव्याद्वारे शोध घेतला जाणार नाही असा दुवा (Unsaught Link):** असा दुवा म्हणजे ज्या दुव्याचा शेवट वर्गांकाच्या पैलूतील पृथक घटकाने होतो (isolate focus in a facet of a class number); तसेच या विषय संज्ञेच्या साहाय्याने वाचक ग्रंथांचा शोध घेणार नाही.


**३. ज्या दुव्याद्वारे माहितीचा शोध घेतला जाईल असा दुवा (Sought Link) :** साधारणपणे वाचक विषय संज्ञेच्या साहाय्याने माहितीचा शोध घेईल असा दुवा.

**४. नसलेला दुवा (Missing Link) :** वर्गांकामध्ये अंकांची एक शृंखला (Chain) असते. कारण जसजसा वर्गांक सामान्याकडून विशेषत्वाकडे जातो तेव्हा मुख्य विषयापासून उपविषयांकडे विषयाची उतरंड तयार होते. परंतु, या उतरंडीमध्ये काही जागा (digits, अंक) रिकाम्या सोडलेल्या असतात. अशा रिकाम्या सोडलेल्या अंकांना (digits) नसलेला दुवा म्हणतात.


आता आपण शृंखला प्रक्रियेद्वारे कोलन वर्गीकरण पद्धती व ड्युई डेसिमल वर्गीकरण पद्धतीनुसार विषय निर्देश नोंदी (Class Index Entries - वर्गीकृत तालिकेत) व विषय शीर्षक नोंदी (एएसीआर तालिका संहितेनुसार) कशा केला जातात ते पाहूया.

**कोलन वर्गीकरण पद्धतीनुसार शृंखला प्रक्रिया :**

O111,2J64P ची वर्गांक शृंखला खालीलप्रमाणे आहे.





शीर्षके पुढीलप्रमाणे :





**ड्युई डेसिमल वर्गीकरण पद्धतीनुसार शृंखला प्रक्रिया :**

ड्युई डेसिमल वर्गीकरण पद्धतीनुसार शृंखला प्रक्रिया कशी केली जाते व त्यापासून विषय शीर्षके किंवा विषय शीर्षक नोंदी कशा तयार केल्या जाऊ शकतात ते पाहू या. (अशा पद्धतीने विषय शीर्षके तयार करून सर्वप्रथम 'ब्रिटिश नॅशनल बिब्लिओग्राफी' ने १९५० पासून १९६० पर्यंत वापर केला).

621.328 याची वर्गांक शृंखला खालीलप्रमाणे आहे.




शीर्षके पुढीलप्रमाणे :



## उदाहरणे

**१) एका लेखकाने लिहिलेला ग्रंथ :**

(मराठी भाषेतील)

सूचीय तपशील पुढील प्रमाणे

ग्रंथनाम : पानिपत

लेखक : पाटील, विश्वास

प्रकाशक : राजहंस प्रकाशन प्रा. लि.

प्रकाशन स्थळ : पुणे, प्रकाशन वर्ष : २०१७, आवृत्ती : ४ थी

ग्रंथांची पृष्ठे : प्राथमिक पृष्ठे xxi, मुख्य मजकुराची पृष्ठे - ६१३ (ग्रथांत नकाशे दिलेले आहेत.)

आकार : २२ सें.मी.


वर्गांक : 891.463

ग्रथांक : PAT

दाखल अंक : ९५६२२

ISBN : 978-81-7434-906-4

या ग्रथांच्या तालिका नोंदी कशा होतील ते पाहूया.



मुख्य नोंद

पाटील, विश्वास

पानिपत / विश्वास पाटील . - ४ थी आ. - पुणे : राजहंस प्रकाशन, २०१७.


PAT/PAN    xxi, ६१३ पृष्ठे : नकाशे ; २२ सें. मी.

891.463    ISBN   978 81 7434 906 4

1. कादंबरी, मराठी   २. वाङ्मय, मराठी

I. शीर्षक

९५६२२



ग्रंथ शीर्षक नोंद

पानिपत

पाटील, विश्वास

पानिपत / विश्वास पाटील . - ४ थी आ. - पुणे : राजहंस प्रकाशन,

891.463    २०१७.

PAT/PAN    xxi, ६१३ पृष्ठे : नकाशे ; २२ सें. मी.

ISBN   978 81 7434 906 4

९५६२२    1. मराठी कादंबरी   २. मराठी वाङ्मय

I. शीर्षक

विषय शीर्षक नोंद

कादंबरी, मराठी
पाटील, विश्वास
पानिपत / विश्वास पाटील . – ४ थी आ. – पुणे : राजहंस प्रकाशन,
891.463 २०१७.
PAT/PAN xxi, ६१३ पृष्ठे : नकाशे ; २२ सें. मी.
ISBN 978 81 7434 906 4


९५६२२ १. मराठी कादंबरी I. शीर्षक

विषय शीर्षक नोंद

वाङ्मय, मराठी
पाटील, विश्वास
पानिपत / विश्वास पाटील . – ४ थी आ. – पुणे : राजहंस प्रकाशन,
891.463 २०१७.
PAT/PAN xxi, ६१३ पृष्ठे : नकाशे ; २२ सें. मी.
ISBN 978 81 7434 906 4

९५६२२

**वर्गांक 891.463 ची शृंखला प्रक्रिया (Chain Preocedure) पुढीलप्रमाणे :**



**(२) दोन लेखकांनी लिहिलेला ग्रंथ (इंग्रजी) :**

ग्रंथाचा सूचीय तपशील पुढील प्रमाणे :

ग्रंथनाम (Title of the book) : Economic Geography

लेखक (Author) : B.W.Hodder and Roger Lee

प्रकाशक (Publisher) : Methuen and Co. Ltd.

प्रकाशन स्थळ (Place of Publication) : London

प्रकाशन वर्ष (Year of Publication) : 1974

आवृत्ती (Edition) : $2^{nd}$

ग्रंथाची पृष्ठे (Pagination) : Primery-xvi, 207 pages

ग्रंथातील इतर माहिती (Others elements of information) : The book has appendices, includes index, bibliography and general index

ISBN : 978 04 1607 080 4

आकार (Size of the book) : 22 c.m.

बोधांक (Call No. of the book) : 913
HOD/ECO
20430

Main Entry

Hodder, B.W.
Economic geography / B. W. Hodder and Roger Lee . – $2^{nd}$ . – London : Methuen and Co. Ltd. , 1974
913 xvi, 207p ; 22 c.m.
HOD/ECO Includes index and bibliography

ISBN : 978 04 1607 080 4
20430 1. Geography, Economic 2. Geography
I. Title

Added Title Entry

Economic geography
Hodder, B.W.
Economic geography / B. W. Hodder and Roger
913 Lee . – $2^{nd}$ . – London : Methuen and Co. Ltd. , 1974
HOD/ECO xvi, 207p ; 22 c.m.
Includes index and bibliography

20430 ISBN : 978 04 1607 080 4

Subject Heading Entry-1

GEOGRAPHY, ECONOMIC

Hodder, B.W.

Economic geography / B. W. Hodder and Roger

913 Lee . - 2nd . - London : Methuen and Co. Ltd. , 1974

HOD/ECO xvi, 207p ; 22 c.m.

Includes index and bibliography

20430 ISBN : 978 04 1607 080 4

Subject Heading Entry-2

GEOGRAPHY

Hodder, B.W.

Economic geography / B. W. Hodder and Roger

913 Lee . - 2nd . - London : Methuen and Co. Ltd. , 1974

HOD/ECO xvi, 207p ; 22 c.m.

Includes index and bibliography

20430 ISBN : 978 04 1607 080 4

Added Author Entry

Lee, Roger

Hodder, B.W.

Economic geography / B. W. Hodder and Roger

913 Lee . - 2nd . - London : Methuen and Co. Ltd. , 1974

HOD/ECO xvi, 207p ; 22 c.m.

Includes index and bibliography

20430 ISBN : 978 04 1607 080 4

**(३) एका लेखकाने लिहिलेला ग्रंथ (इंग्रजी) :**

सूचीय तपशील पुढीलप्रमाणे :

ग्रंथनाम (Tittle of the book) : Sikhs in England : The Development of Migrant Community

लेखक (Author) : A.W. Helweg (Arthur Wesley Helweg)

प्रकाशक (Publisher) : Oxford University Press

प्रकाशन स्थळ (Place of Publication) : Delhi, Mumbai, Calcutta

प्रकाशन वर्ष (Year of Publication) : 1974, 1977

आवृत्ती (Edition) : 1st


ग्रंथाची पृष्ठे (Pagination) : xi, 175 pages

ग्रंथातील इतर माहिती (Other elements of information) : The book contains maps

ISBN – 978 01 9561 150 2

बोधांक (Call No. of the book) : 305.669142
SIK/HEL
26414

आकार (Size of the book) : 22 c.m.



Main Entry

Helweg, Arthur Wesley


305.669142 Sikhs in England : the development of migrant community / A.W. Helweg . – 1st ed. . – Delhi : Oxford University Press, 1977.

HEL/SIK xi, 175p. : maps ; 22 c.m.

ISBN : 978 01 9561 150 2

26414 1. SOCIOLOGY 2. INTERNATIONAL MIGRATION 3. SIKHS – INTERNATIONAL MIGRATION

I. Title



Added Title Entry

Sikhs in England : the development of migrant community.

Helweg, Arthur Wesley

305.669142 Sikhs in England : the development of migrant community / Arthur Wesley Helweg . – 1st ed. . – Delhi : Oxford University Press, 1977.

HEL/SIK xi, 175p. : maps ; 22 c.m.

26414 ISBN : 978 01 9561 150 2

Subject Heading Entry

SOCIOLOGY

Helweg, Arthur Wesley

Sikhs in England : the development of migrant

305.669142 community / A.W. Helweg . – 1st ed. . – Delhi : Oxford

HEL/SIK University Press, 1977.

xi, 175p. : maps ; 22 c.m.

ISBN : 978 01 9561 150 2

26414

---

Subject Heading Entry

INTERNATIONAL MIGRATION

Helweg, Arthur Wesley

Sikhs in England : the development of migrant

305.669142 community / Arthur Wesley Helweg . – 1st ed. . – Delhi :

HEL/SIK Oxford University Press, 1977.

xi, 175p. : maps ; 22 c.m.

ISBN : 978 01 9561 150 2

26414

---

Subject Heading Entry

SIKHS – INTERNATIONAL MIGRATION – UK

Helweg, Arthur Wesley

Sikhs in England : the development of migrant

305.669142 community / Arthur Wesley Helweg . – 1st ed. . – Delhi :

HEL/SIK Oxford University Press, 1977.

xi, 175p. : maps ; 22 c.m.

ISBN : 978 01 9561 150 2

26414

**(४) संपादित केलेला ग्रंथ :**

सूचीय तपशील पुढीलप्रमाणे :

ग्रंथनाम (Tittle) : Contesting Postcolonialisms

लेखक (Author) : Edited by Jasbir Jain and Veena Singh

प्रकाशक (Publisher) : Rawat Publications

प्रकाशन स्थळ (Place of Publication) : Jaipur and New Delhi

प्रकाशन वर्ष (Year of publilcation) : 2000

आवृत्ती (Edition) : $1^{st}$


ग्रंथाची पृष्ठे (Pagination) : xix, 271 pages

ग्रंथातील इतर माहिती (other elements of information) : The book has Index

ISBN : 81 7033 5507

ग्रंथाचा आकार (Size of the book ) : 22 c.m.


बोधांक (Call No. of the book) :325.31
JAI/CON
60534



Main Entry

Contesting postcolonialism / ed. by Jasbir Jain and
Veena Singh . – $1^{st}$ ed. – Jaipur : Rawat Publications,
2000.
325.31 xix, 271p. ; 22 c.m.
JAI/CON Includes index

ISBN 81 7033 5507
60534 1. POSTOCOLONISATION 2. COLONISATION
3. POLITICS
I. Jain, Jasbir
II. Singh, Veena



Author Entry

Singh, Veena, ed.
Contesting postcolonialism / ed. by Jasbir Jain and
Veena Singh . – $1^{st}$ ed. – Jaipur : Rawat Publications,
325.31 2000.
JAI/CON xix, 271p. ; 22 c.m.
Includes index

60534 ISBN 81 7033 5507

Author Entry

Jain, Jasbir, ed.

Contesting postcolonialism / ed. by Jasbir Jain and
Veena Singh . – 1$^{st}$ ed. – Jaipur : Rawat Publications,
325.31 2000.
JAI/CON xix, 271p. ; 22 c.m.
Includes index

60534 ISBN 81 7033 5507

Subject Heading Entry

POSTOCOLONISATION

Contesting postcolonialism / ed. by Jasbir Jain and
Veena Singh . – 1$^{st}$ ed. – Jaipur : Rawat Publications,
325.31 2000.
JAI/CON xix, 271p. ; 22 c.m.
Includes index


60534 ISBN 81 7033 5507

Subject Heading Entry

COLONISATION

Contesting postcolonialism / ed. by Jasbir Jain and
Veena Singh . – 1$^{st}$ ed. – Jaipur : Rawat Publications,
325.31 2000.
JAI/CON xix, 271p. ; 22 c.m.
Includes index

60534 ISBN 81 7033 5507



Subject Heading Entry

POLITICS

Contesting postcolonialism / ed. by Jasbir Jain and
Veena Singh . – 1st ed. – Jaipur : Rawat Publications,
325.31 2000.
JAI/CON xix, 271p. ; 22 c.m.
Includes index

60534 ISBN 81 7033 5507

**वर्गांक 325.31 ची शृंखला प्रक्रिया (Chain Preocedure) पुढीलप्रमाणे :**

